साप्ताहिक
**कात्रजच्या बोगद्यातून**
ग्रामीण भागातील वाचकांचे आवडते साप्ताहिक
२९३/२९२ शनिवार पेठ, ऐश्वर्या अपार्टमेंट, तांबे बोळ, पुणे ३०
फोन : २४४७१५४३ फॅक्स : २४४९५३०७

विदर्भ, मराठवाडा, बीड, उस्मानाबाद, मुंबई, ठाणे, कोकण, गोवा, सातारा, सांगली, अमरावती, धुळे, अहमदनगर, उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातून वितरीत होणारे एकमेव दैनिक

# लोकमान्य सांजवार्ता

आर.एन.आय. नं. ७०१११/१९९९
रजि. नं. पी.सी.डब्ल्यू/००९/२०२१-२०२३

**लोकमान्य सांजवार्ता**
एक अद्वितीय सायंदैनिक
दररोज वाचा
किंमत १ रुपया, पाने ४
(रविवार सुट्टी)
ज्ञान, विज्ञान, मनोरंजन आणि ताज्या घडामोडींनी भरलेला
दररोज दु. ४ वाजता आपल्या हाती
२९३/२९२ शनिवार पेठ, तांबे बोळ, पुणे -३०
फोन : २४४७१५४३/ २४४९५३०७

वर्ष २३ वे/अंक ३०२ वा ◆ शहर आवृत्ती/पुणे, बुधवार २५ जानेवारी २०२३ (दैनिक) Posted at S.P. College Post Pune-30 /January 2023 ● पृष्ठे-४ ● किंमत एक रुपया


## थोडक्यात महत्त्वाचे

### माघी गणेशोत्सवासाठी मंडपांचे शुल्क माफ



**पुणे : मुंबई :** माघी गणेशोत्सवाला बुधवारपासून सुरुवात होत असून सार्वजनिक मंडळांचे मंडप शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे. करोना व टाळेबंदीच्या दोन वर्षांनंतर साजऱ्या होणाऱ्या सणांचे शुल्क माफ करण्यात आले होते. त्याच धर्तीवर हे शुल्कही माफ करण्यात आले आहे. ज्या मंडळांनी शुल्क भरले असेल त्यांना शुल्क परत केले जाणार आहे. माघी गणेशोत्सव बुधवारपासून सुरू होत आहे.

### नीला गोखले यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्तीपदी नियुक्ती

**मुंबई :** वकील नीला गोखले यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या विधि व न्याय मंत्रालयाने याबाबतची अधिसूचना मंगळवारी प्रसिद्ध केली. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने १० जानेवारी रोजी गोखले यांची उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली होती. गोखले यांच्या नियुक्तीमुळे मुंबई उच्च न्यायालयात कार्यरत न्यायमूर्तींची संख्या ६६ झाली आहे. मालेगाव येथे २००८ सालच्या बॉम्बस्फोट खटल्यातील प्रमुख आरोपी लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित याने दोषमुक्त करण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका केली होती. त्यावेळी गोखले यांनी पुरोहितची बाजू मांडली होती. न्यायवृंदाच्या १० जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत गोखले यांना उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून बढती देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती. दरम्यान, उच्च न्यायालयात ६५ न्यायमूर्ती कार्यरत होते. गोखले यांच्या नियुक्तीनंतर ही संख्या ६६ झाली आहे.

### ३४ महिन्यांनंतर प्रथमच मुंबईत दिवसभरात शून्य करोना नोंद

**मुंबई :** मुंबईमध्ये मंगळवारी एकही नवीन करोना रुग्णाची नोंद झाली नाही. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाला असताना मुंबईमध्ये तब्बल ३४ महिन्यांनंतर २४ जानेवारी २०२३ रोजी करोना रुग्णांची शून्य नोंद झाली आहे. त्यामुळे मुंबईतून करोनाचा प्रादुर्भाव पूर्णपणे संपुष्टात येत असून, मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे. मुंबईमध्ये करोना रुग्णांचा पहिला रुग्ण मार्च २०२० मध्ये सापडला होता. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत करोना रुग्णांच्या संख्येने पाच अंकी संख्या गाठली तर हजारो रुग्णांचा मृत्यू झाला. मात्र राज्य सरकार आणि मुंबई पालिकेने राबविलेल्या विविध उपाययोजनांमुळे करोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यात यश आले. त्यानंतर आलेल्या तीन लाटांमध्येही रुग्णांवर योग्य उपचार करून साथ रोखण्यात यश आले. परिणामी मागील काही दिवसांपासून मुंबईसह राज्यातील करोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आहे.

## ‘सुशासन’ अंमलबजावणीत राज्याला अव्वल स्थानावर नेणार : देवेंद्र फडणवीस



**मुंबई:** ‘सुशासन’ ही संकल्पना व्यापक प्रमाणात राबविण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. यासाठी जिल्हास्तरापर्यंत सुशासन निर्देशांक असणार आहे. तत्पर, पारदर्शक कार्यपद्धतीद्वारे सुशासन अंमलबजावणीत राज्याला अव्वल स्थानावर नेणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केले.

केंद्र सरकारच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभाग (डीएआरपीजी) आणि राज्य सरकारच्या वतीने आयोजित ‘ई-गव्हर्नन्स’ या विषयावरील दोनदिवसीय प्रादेशिक परिषदेत उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

जनतेला सुशासन देण्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा भर असून त्याचा मुख्य गाभा ई-गव्हर्नन्स आहे. कारण तंत्रज्ञान सर्वांना एकसमान सेवा प्रदान करते. गतिमानता, पारदर्शकता आणि जबाबदारीची भावना हे सुशासन प्रणालीचे महत्त्वाचे स्तंभ आहेत. ई-गव्हर्नन्स संकल्पना या सर्व उद्देशांनी परिपूर्ण असून ई-गव्हर्नन्सद्वारे लोकांना सेवा आणि योजनांचा तत्पर लाभ मिळत आहे.

शासनाचे धोरण प्रत्यक्ष लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तंत्रज्ञान, ई-गव्हर्नन्स उपयुक्त ठरत आहे, असे फडणवीस यांनी या वेळी सांगितले.

ई-सेवेमुळे जनतेला आपल्या अर्जावर, निवेदनाबाबत काय कार्यवाही होत आहे याची माहिती मिळते. ‘आपलं सरकार’द्वारे जन तक्रार दाखल करणे, त्यावर तत्काळ कारवाई या बाबी गतिमान झाल्या आहेत. तक्रारदारांच्या तक्रारीची दखल घेऊन नुकसानभरपाई देणे शक्य होत आहे.

त्यासोबतच भ्रष्टाचारमुक्त कार्यपद्धतीसाठी एक खिडकी योजना यांसारखे लोकोपयोगी उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी ई-गव्हर्नन्स पूरक असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला.

या वेळी राज्यात राबवण्यात येत असलेल्या ई-ऑफिस प्रणालीच्या अंमलबजावणीबाबतची चित्रफित दाखवण्यात आली.

## नव्या मेट्रो सेवेमुळे घरांच्या किमतीत वाढ

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या नव्या मेट्रोमुळे अंधेरी ते दहिसर पूर्व-पश्चिम परिसरातील घरांच्या किमतीत वाढ झाल्याचे आढळून आले आहे. गेले काही वर्षे विकल्या न गेलेल्या घरांनाही आता खरेदीदार मिळू लागला आहे. वर्षभरात घरांच्या किमतीत पाच ते दहा टक्के इतकी वाढ झाली आहे. गेल्या वर्षभरात विकल्या गेलेल्या एकूण सव्वा लाख घरांपैकी अर्धी घरे पश्चिम उपनगरात विकली गेली आहेत.

वर्सोवा- घाटकोपर ही मेट्रो सेवा जून २०१४ मध्ये कार्यान्वित झाली तर मेट्रो दोन-अ आणि सात या मेट्रो मार्गाचे काम ऑक्टोबर २०१६ मध्ये सुरू झाले. मात्र वर्सोवा-घाटकोपर सेवेला झालेला अतिविलंब पाहता नवी मेट्रो प्रत्यक्षात कधी कार्यान्वित होईल, याबाबत ठामपणे सांगितले जात नव्हते. या पट्ट्यात मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्पाचे काम सुरू आहे. मात्र या परिसरातील कमालीची वाहतूक कोंडी लक्षात घेता या घरांना फारशी मागणी नव्हती. मात्र मेट्रोसेवेचे काम जोरात सुरु झाल्यानंतर या परिसरातील घरांची मागणी वाढू लागली. ही सेवा प्रत्यक्षात सुरु होण्याची चिन्हे दिसू लागताच विकासकांनीही त्याचा फायदा उठविला. आतापर्यंत घरांचे जे दर होते त्यात पाच ते दहा टक्के वाढ केली. त्यानंतरही घरांची विक्री वाढू लागली. आता अनेक गृहप्रकल्प या परिसरात उभे राहत असून या प्रकल्पातील घरांच्या किमतीत वाढ झाली आहे.

## दावोसमध्ये ४० कोटींची उधळपट्टी!

### मुख्यमंत्र्यांनी दौऱ्याचा तपशील जाहीर करावा : आदित्य ठाकरे



**मुंबई :** राज्यात गुंतवणूक आणण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या २८ तासांच्या दावोस दौऱ्यात तब्बल ३५ ते ४० कोटींचा खर्च झाला असून या दौऱ्यात मुख्यमंत्र्यांनी नेमके काय केले, याचा तपशील जाहीर करण्याची मागणी शिवसेना नेते माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी मंगळवारी केली. शिवसेना भवन येथील पत्रकार परिषदेत आदित्य ठाकरे यांनी दावोस दौऱ्यावरून पुन्हा एकदा मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले.

चार दिवसांच्या दावोस दौऱ्यात साधारणतः ३५ ते ४० कोटी रुपये अंदाजित खर्च झाला. म्हणजेच दिवसाला साडेसात ते दहा कोटी खर्च झाला. यामध्ये आणखी नवीन खर्च वाढू शकतो, या दौऱ्यात त्यांच्यासोबत अधिकृत कोण होते, मित्रपरिवार सोबत गेला होता का, ते कुठे राहिले, त्यांचा खर्च कोणी केला, त्यांच्या गाड्यांचा खर्च कोणी केला, हे सगळे लोकांसमोर यायला हवे अशी मागणी ठाकरे यांनी केली. दावोसला जाण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी चार्टर्ड विमानाचा वापर केला. यावर दोन ते अडीच कोटी खर्च झाला असेल. कमर्शिअल विमानाऐवजी चार्टर्ड विमानाचा वापर लवकर पोहोचण्यासाठी करता. पण एकनाथ शिंदे उशिरा पोहोचले. यामुळे सकाळी साडेसात वाजता होणारे उद्घाटन सायंकाळी साडेसातला झाले व गुंतवणुकीसाठीच्या अनेक बैठका रद्द झाल्या, असा दावाही ठाकरे यांनी केला. बैठकांचे फोटो किंवा पुरावे कुठेही दिसले नाहीत. दावोसमध्ये एकूण झालेल्या करारांपैकी ३५ ते ४० कोटींचे जे करार झाले त्या तीन कंपन्या तर महाराष्ट्रातीलच होत्या असा दावा त्यांनी केला.

## शिवसेना-वंचित युतीबाबत राष्ट्रवादीची सावध प्रतिक्रिया; झाले गेले विसरण्याचीही तयारी



**मुंबई :** महाविकास आघाडीतील घटकपक्षांनी कुणाला नवीन मित्र जोडायचे हा त्यांना अधिकार आहे, परंतु जोडलेले मित्र शेवटपर्यंत म्हणजे निवडणुकीतही बरोबर राहतील का, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे, अशी काहीशी सावध प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसने शिवसेना-वंचित बहुजन आघाडी यांच्या युतीबाबत घेतली आहे. मात्र त्याचबरोबर मागे जे घडले असेल ते विसरूनच पुढे जायचे असते अशी तयारीही वंचित आघाडीबाबत राष्ट्रवादीने दर्शविली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत, विधान परिषदेच्या निवडणुका, चिंचवड व कसबा विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत काय भूमिका असावी, याबाबत चर्चा झाल्याची माहितीही विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिली. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व प्रकाश आंबेडकर यांनी शिवसेना-वंचित बहुजन आघाडीच्या युतीची घोषणा केली, त्यावर बोलताना पवार म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या कोटय़ातून कुणाला मित्रपक्ष म्हणून घ्यायचे हा सर्वस्वी त्यांचा अधिकार आहे .राजकारणात मागच्या निवडणुकीत कुणी जागा पाडल्या, याला काही अर्थ नसतो. येणाऱ्या निवडणुका डोळय़ासमोर ठेवून आराखडे आखावे लागतात व राजकीय भूमिका मांडावी लागते. युती-आघाडी होते त्या वेळी ‘मागचे झाले गेले गंगेला मिळाले’ अशी भूमिका घेऊन पुढे गेलो, तरच योग्य गोष्टी घडतात असे त्यांनी सांगितले.

शिवसेना आणि वंचित युतीला आमचा विरोध नाही, परंतु नवे मित्र जोडताना ते मित्र शेवटपर्यंत राहतील व निवडणूक आपल्याबरोबर लढवतील याची काळजी घेणे आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केली.

### पोटनिवडणुकीबीबत एकत्रित निर्णय

विधानसभेच्या कसबा व चिंचवड मतदारसंघातील पोटनिवडणुकीबाबत काय भूमिका घ्यायची याचा निर्णय महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष एकत्रित बसून करतील, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.

## मुंबईत सोमवारी चोवीस तासांसाठी पाणीपुरवठा बंद

**मुंबई :** भांडुप संकुल येथील जलशुद्धीकरण केंद्रास अतिरिक्त ४,००० मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी जोडण्याचे काम महानगरपालिकेद्वारे हाती घेण्यात येणार आहे. तसेच भांडुप संकुलाशी संबंधित असलेल्या विविध जलवाहिन्यांवर दोन ठिकाणी झडपा बसविणे, नवीन जलवाहिन्यांची जोडणी करणे आणि दोन ठिकाणी उद्भवलेली गळती दुरुस्त करणे इत्यादी कामे हाती घेतली जाणार आहेत. यामुळे ३० जानेवारी रोजी चोवीस तासांसाठी पश्चिम आणि पूर्व उपनगरांत पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार आहे.

पाणीपुरवठा सुरळीतपणे करण्यासाठी पालिकेने विविध कामे हाती घेतली आहेत. या कामांमुळे ३० जानेवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून दुसऱ्या दिवशी ३१ जानेवारी रोजी सकाळी १० वाजेपर्यंत मुंबईतील २४ विभागांपैकी १२ विभागांतील पाणीपुरवठा पूर्णतः बंद असणार आहे, तर दोन विभागांतील पाणीपुरवठ्यात २५ टक्के कपात करण्यात येणार आहे, अशी माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेचे जल अभियंता पुरुषोत्तम माळवदे यांनी दिली आहे.

पश्चिम उपनगरांतील अंधेरी पूर्व, पश्चिम, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर, वांद्रे पूर्व व पश्चिम या नऊ विभागांमधील अनेक परिसरांतील पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित असणार आहे. तर पूर्व उपनगरांतील भांडुप, घाटकोपर, कुर्ला येथील अनेक भागांतदेखील पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित असणार आहे. मात्र दादर, माहीम पश्चिम, प्रभादेवी व माटुंगा पश्चिम या परिसरांतील पाणीपुरवठ्यात दि. ३० व ३१ जानेवारी २०२३ रोजी २५ टक्के कपात करण्यात येणार आहे. तर धारावी परिसरातील ज्या भागात दुपारी ४ ते सायंकाळी ९ यादरम्यान पाणीपुरवठा होतो, त्या भागात ३० जानेवारी २०२३ रोजी पाणीपुरवठा पूर्णपणे बंद असणार आहे.

## उच्च शिक्षणाच्या सामर्थ्यांवर भारत ‘विश्वगुरू’ बनेल

### ‘भारतीय उच्च शिक्षणाचे धोरण व परिवर्तन’ कार्यशाळेचा जाहिरनामा




**पुणे (दैनिक लोकमान्य सांजवार्ता प्रतिनिधी) :** उच्च शिक्षणाच्या सर्व स्तरावर गुणवत्ता वाढविणे, प्रवेशयोग्य, सर्वसमावेशक आणि परवडणारी उच्च शिक्षण प्रणाली तयार करणे, संशोधन आणि नवोपक्रमातील उत्कृष्टतेच्या संस्कृतीला प्रोत्साहन देणे, शाश्वतता आणि सामाजिक सुधारणेचा पाठपुरावा करणे, शिक्षणातील आंतरराष्ट्रीयीकरण आणि जागतिक कनेक्शनचे मूल्ये प्रदर्शित करणे व भारताच्या सांस्कृतिक वारशाचा प्रचार व प्रसार करणे. असा जाहिरनामा कुलगुरूंच्या परिषदेत सर्वानुमते घोषित केला. त्यानुसार कंसोर्टियम फॉर ॲडव्हानसिंग इंडियन टर्शरी एज्यूकेशन (साईट) संघटना अस्तित्वात आणली. या द्वारे उच्च शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल घडविण्याचे कार्य साईट द्वारे केले जाणार आहे. अशी माहिती आयआयटी कानपुरचे माजी संचालक पद्मश्री डॉ. संजय धांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

‘भारतीय उच्च शिक्षणाचे धोरण व परिवर्तन’ या विषयावर एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या सहकार्याने ‘हायर एज्युकेटर्स फाउंडेशन’ तर्फे आयोजित करण्यात आलेली तीन दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेते ते बोलत होते.

यावेळी वर्माट युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष डॉ. सुरेश गरिमेला, कुलगुरू डॉ. संविक भट्टाचार्य, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, डॉ. प्रसाद खांडेकर व डॉ. सुब्बाराव उपस्थित होते.

डॉ. संजय धांडे म्हणाले, भारतातील उच्च शिक्षणाच्या सामर्थ्यांची जाणीव करून देण्यासाठी कृती करण्याचा संकल्प आहे. त्यानुसार राष्ट्र पुन्हा एकदा विश्वगुरू बनेल. न्याय, शाश्वत आणि सामंजस्यपूर्ण जगाची प्रगती करणार्या जागतिक समुदायामध्ये एक आदरणीय भागीदारी म्हणून सहभागी होणार आहोत.

डॉ. सुरेश गरिमेला म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हंटल्याप्रमाणे शिक्षणाद्वारे भारत विश्वगुरू बनणार आहे. आज संपूर्ण जगात भारतीय शिक्षण तज्ञांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांनी शिक्षणक्षेत्रात नव नवीन प्रयोग केले आहेत.

राहुल कराड म्हणाले, देश विदेशातील कुलगुरूंच्या विचारांच्या आदान प्रदानामुळे भारतीय शिक्षणाचा स्तर खूप उंचावेल. हे शिक्षण क्षेत्रातील एक ऐतिहासिक पाऊल असेल. शैक्षणिक क्षेत्रात येणार्या विभिन्न समस्यांचे निरासण कसे करता येईल. तसेच भारतीय शिक्षण पद्धतीत एकच प्रवेश परिक्षेचे कॅलेन्डर नाही, ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे उच्च शिक्षणात बदल घडणे आवश्यक आहे.

डॉ. संविक भट्टाचार्य म्हणाले, उच्च शिक्षणासाठी भविष्यात भारतात खूप मोठी संधी आहे. त्या संधीचा लाभ खाजगी विद्यापीठांनी घ्यावा. खाजगी आणि नॉन गर्व्हनमेंट विद्यापीठांसमोर सध्या अनेक आव्हाणे आहेत. परंतू या परिषदेनंतर ‘साईट’ या संकल्पानुसार शिक्षण पद्धतीत आमुलाग्र बदल घडणार आहे.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेद्वारे (पीसीएमसी) जल्लोष शिक्षणाचा २०२३ ची घोषणा

**पिंपरी चिंचवड (दैनिक लोकमान्य सांजवार्ता प्रतिनिधी) :** शालेय, आंतरशालेय, शहर, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने (झउचउ) जल्लोष शिक्षणाचा २०२३ हा नाविण्यपुर्ण उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रदर्शित करण्यासाठी तसेच शाळेच्या मानकांचे आणि सर्वोत्तम पद्धतींचे मूल्यमापन करण्याच्या उद्येश्याने आयोजित केला जाणारा हा दोन दिवसीय मेगा बोनान्झा २४ आणि २५ जानेवारी, २०२३ रोजी ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित केला जाईल.

याठिकाणी विविध प्रकारचे गेम झोन, स्पर्धा, बुक स्टॉल, शिक्षकांसाठी स्पर्धा, प्रश्नमंजुषा , ट्रेजर हन्टसह अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातील आणि शेवटी बक्षीस वितरण केले जाईल. विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने, आयोजकांनी जल्लोष शिक्षणाचा २०२३ ची संकल्पना मांडली आहे. या नेत्रदीपक व्यासपीठामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आंतरिक क्षमता दाखवता येतील, आजच्या काळातील आवश्यक कौशल्यांना, कलागुणांना यामुळे वाव मिळेल. कार्यक्रमाच्या शुभारंभावेळी प्रदीप जांभळे पाटील अतिरिक्त आयुक्त म्हणाले, पिंपरी चिंचवडमधील आमच्या सार्वजनिक शाळांसाठी



हा विद्यार्थी-केंद्रित कार्यक्रम आयोजित करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. आम्हाला माहित आहे की आमच्या विद्यार्थ्यांमध्ये अफाट प्रतिभा आहे आणि त्यांनी केवळ शैक्षणिकच नव्हे तर क्रीडा, कला, नाटक, हस्तकला, तंत्रज्ञान, डिझाइनमध्येही प्रावीण्य मिळवावे ही आमची इच्छा आहे. सहभागी शाळांवर आमचे लक्ष असेल. सॉफ्ट इन्फ्रास्ट्रक्चर, एक्सटर्नल कॉलॅबोरेशन, शिक्षक प्रशिक्षण इत्यादीसह विविध पॅरामीटर्सवर सहभागी शाळा आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन केले जाईल. आमच्या उपक्रमांद्वारे कल्पनांचे हस्तांतरण आणि मुलांचा सर्वांगीण विकास करण्याचा हा एक अनोखा प्रयत्न असेल. संदीप खोत, उपायुक्त, पुढे म्हणाले, पिंपरी चिंचवडमध्ये प्रथमच जल्लोष शिक्षणाचा कार्यक्रम आयोजित करताना आम्हाला अभिमान वाटतो. सर्व विद्यार्थ्यांसाठी ही कौशल्ये प्रदर्शित करण्याची, नवविचार करण्याची, तयार करण्याची, डिझाइन बनवण्याची, अपेक्षा साध्य करण्याची, क्षमता विकसित करण्याची सुवर्ण संधी आहे. आम्ही सर्व शाळांना या शैक्षणिक प्रदर्शनाचा भाग होण्यासाठी आणि मोठ्या संख्येने नावनोंदणी करण्यासाठी आवाहन करू इच्छितो जेणेकरुन आम्ही नवीन प्रतिभांना वावा देऊन त्यांना त्यांच्या पात्रतेची नवी ओळख देऊ शकू. जल्लोष शिक्षणाचा २०२३ मध्ये पीसीएमसी मधील १२९ शाळेंतील विद्यार्थ्यांचा सहभाग दिसेल. एकदा नोंदणी प्राप्त झाल्यानंतर पहिल्या टप्प्यातील टिम निवडीची सुरुवात झाली जी शालेय स्तरावर आणि शहर पातळीवर पार पडली. प्रत्येक झोनमधील एक सर्वोत्कृष्ट शाळा ओळखण्यासाठी शालेय आव्हानांच्या निकषांवर एक सर्वसमावेशक रेटिंग प्रणाली तयार केली गेली आहे.

## ‘गृहशोध महोत्सवा’मध्ये नाईकनवरे डेव्हलपर्सच्या तळेगाव येथील नीलया प्रकल्पाच्या १०० हून अधिक युनिटची तीन महिन्यांत यशस्वीपणे विक्री



**पुणे (दैनिक लोकमान्य सांजवार्ता प्रतिनिधी) :** नाईकनवरे डेव्हलपर्स, मुंबई, गोवा आणि पुणे येथील समाजकेंद्रित निवासी आणि व्यावसायिक प्रकल्पांसाठी प्रसिद्ध आहे. नाईकनवरे यांनी तळेगावस्थित निवासी प्रकल्प नीलय गृहशोध महोत्सव सुरू झाल्यानंतर ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ दरम्यान मोठा प्रतिसाद मिळाल्याचे जाहीर केले आहे.

नाईकनवरे रिअल इस्टेट कंपनीने नीलयाच्या एकूण यादीतून १००युनिट्सची विक्री केली आहे. हा प्रकल्प सर्व जीवनावश्यक सुविधांसह तीन टॉवर्समध्ये असून ३.५ एकर जमिनीवर विस्तारलेला आहे. नाईकनवरे डेव्हलपर्सने आतापर्यंत बी टॉवरचा ताबा दिला असून ए टॉवरचा ताबा सुरू झाला आहे. सी टॉवरचे शेवटचे बांधकाम जोरात सुरू आहे आणि ते वेगाने विकले जात आहे. हा प्रकल्प तळेगाव दाभाडे येथे महामार्गाजवळ स्थित आहे, नीलय हे मुंबई आणि पुणे सारख्या मेट्रो शहरांशी चांगले जोडलेले असून येथे नयनरम्य दृश्ये आणि भरपूर शांतता आहे.

या निवासी प्रकल्प व्यायामशाळा, बहुउद्देशीय हॉल, मुलांसाठी खेळण्याची जागा, जॉगिंग ट्रॅक/वॉकवे, ॲम्फीथिएटर, सौरऊर्जेने सुसज्ज इमारती, कॉमन गार्डन, अपार्टमेंट्स आणि दुकानांसाठी इंटरकॉम सिस्टीम यासारख्या जागतिक दर्जाच्या सुविधांची विस्तृत सोई देण्यात आल्या आहेत. रहिवासी आणि अतिथींसाठी येथे पार्किंगची जागा आहे. त्यासोबतच नीलया हे १ बीएचकेमध्ये २ स्नानगृहांसह एक स्मार्ट डिझाइन केलेले घर आहे. तळेगण, दाभाडे, पुणे येथे, शेकडो संभाव्य खरेदीदार १-२ बीएचके अपार्टमेंट खरेदी करण्याच्या विचारात आहेत. नीलय प्रकल्प ३.५ एकर परिसरात पसरलेला आहे. या प्रकल्पात लिफ्ट आणि इतर सुविधांसह आलिशान १२ मजली टॉवरमध्ये अपार्टमेंट बांधले गेले आहेत. विचारपूर्वक बांधलेले अपार्टमेंट्स त्यांच्या आदर्श घरामध्ये खरेदीदारांच्या इच्छेनुसार सर्व सोई देतात. याव्यतिरिक्त, रुग्णालये, शाळा आणि शॉपिंग मॉल्स यासारख्या सोईंमुळे घरमालकांना फायदा होतो.

नाईकनवरे डेव्हलपर्सचे बिझनेस प्रोसेस हेड आनंद नाईकनवरे म्हणाले, गृहशोध इव्हेंट २०२२ ने आम्हाला घर खरेदीदार आणि गुंतवणूकदारांशी जोडण्याचे त्यांचे ध्येय यशस्वीरित्या पूर्ण केले आहे, मला तुम्हाला हे सांगताना आनंद होत आहे की आमच्या सर्वात इष्ट निवासी प्रकल्पांपैकी एक, तळेगाव येथील नीलयला तीन महिन्यांच्या कालावधीत उदंड प्रतिसाद मिळाला आहे. आम्ही १०० पेक्षा जास्त युनिट्स विकल्या आहेत. ज्यांनी या प्रकल्पात गुंतवणूक केली आणि स्वारस्य दाखवले आणि नाईकनवरे डेव्हलपर्ससाठी नीलयला प्रचंड यश मिळवून दिले त्या सर्वांचे आभार मानत आहे.

संभाव्य मालमत्ता खरेदीदार आणि गुंतवणूकदारांसाठी हा करार अधिक किफायतशीर बनवण्यासाठी नाईकनवरे डेव्हलपर्सने गृहशोध ऑफर्स ठेवल्या होत्या. लकी ड्रॉमध्ये १ स्कूटर, ५ दूरदर्शन संच, १० रेफ्रिजरेटर आणि ५ मोबाईल फोन बक्षिसे बक्षिसे देण्यात येत आहेत. कंपनीच्या विधानानुसार, लोकांमध्ये सक्रिय सहभाग दिसून आला आणि त्यांच्यापैकी अनेकांनी, जे लकी ड्रॉसाठी पात्र ठरले, त्यांनी ऑफर केलेल्या बक्षिसांपैकी एक घर घेतले.

नीलया व्यतिरिक्त, नाईकनवरे डेव्हलपर्सचे इतर अनेक प्रकल्प सुरू आहेत, जे मुंबई, पुणे आणि गोव्यामध्ये आहेत आणि काही चालू वर्षात सुरू होणार आहेत.